# स्त्रीत्व, स्त्रीपणा आणि साहित्य

प्रा. डॉ. वेदश्री विजय थिगळे,
सहयोगी प्राध्यापिका, प्रपाठक,
मराठी विभाग प्रमुख,
शांतारामबापू वावरे महाविद्यालय, उत्तमनगर, सिडको,
नाशिक – ८.

## स्त्री संकल्पना :

'स्त्री' हा शब्द कसा निर्माण झाला आणि त्याचा अर्थ काय आहे याचा शोध घेता या शब्दाबद्दल अधिक माहिती मिळते ती व्युत्पत्ती कोशातून. मराठी व्युत्पत्ती–कोशात 'स्त्रयै–विस्तरे–अकामसा' अशी 'स्त्री' या शब्दाची व्युत्पत्ती दर्शविली आहे.[१] शिवाय 'सतरी – स्तरी – स्त्री' अशीही व्युत्पत्ती दर्शविली आहे.[२] याच कोशात 'स्त्रज (णें)' म्हणजे उत्पन्न करणे असे सांगून सृज म्हणजे सर्जने, स्त्रष्टा, ब्रह्मदेव, उत्पत्तीकर्ता असा 'स्त्रज' शब्दाचा अर्थविस्तार दर्शविलेला आहे.[३] याचाच अर्थ आपल्यालाअसा घेता येईल की, 'स्त्रावाने निर्माण होणारी ती निर्मिती आणि स्त्रावाने निर्मिती करणारे जे निर्मितीक्षम आहे ते सृजन'. स्त्री सुध्दा निर्मिती करणारी आहे म्हणून मग तिला 'सर्जना' असे म्हणता येईल. ऋग्वेदातही (४–६–७).[४] 'स्त्री' या शब्दाचा अर्थ 'सुत्री' असा दिलेला आहे. सुत्री म्हणजे जन्मदात्री. वंशाचे सूत्र जुळवून जन्म देणारी ती जन्मदात्री असा अर्थ आपल्याला घेता येईल. व्युत्पत्ती कोशातही स्त्रीसाठी आलेला 'विस्तरे' हा शब्द सुध्दा जन्माचा विस्तार करणारी ती 'विस्तरी' असाच अर्थ सुचवितो. तिच्यासाठी 'अकामसा' असाही शब्द वापरला आहे. साधारणतः स्त्री–सुखाबद्दल, स्त्रियांच्या प्रमुख इंद्रियाकडून मिळणारी संवेदना स्वाभाविक पतिसुख व अपत्यसुख मिळविण्या संबंधीचीच असते.[५] असे म्हटले जाते. म्हणून तिच्यासाठी 'अकामसा' असा शब्द योजलेला असावा.

वेबस्टरच्या इंग्लिश डिक्शनरीमध्ये.[६] देखील 'वुमन', 'फिमेल', या शब्दांचे अर्थ व लक्षणे दिलेली आहेत. 'वुमन' म्हणजे प्रौढ स्त्री मानवजात होय. सामान्यतः प्रौढ स्त्री ही बायकी व चंचल असते. तसेंच असेही म्हणता येईल की, स्त्रीत्वाच्या भावना व स्त्रीपणा असलेली व स्त्रीत्व जागृत ठेवणारी ती स्त्री. स्त्री आणि पुरूष मिळूनच मानवजात तयार होते हे देखील लक्षात घ्यायला हवे.

'फिमेल' या शब्दाचा अर्थ असा दिलेला आहे की, 'प्राणी किंवा झाडे यांच्यातील असे लिंग की जे

निर्मिती करते किंवा अंडी देण्याची वा पिलाला जन्म देण्याची क्षमता असलेले लिंग म्हणजे स्त्री लिंग (फिमेल) होय आणि असे लिंग असलेली व्यक्ती म्हणजे स्त्री होय'.[७] असे आपल्याला म्हणता येईल.

मानवी अंशाला आपल्या उदरात पुनरूत्पादन करण्याची रचना असलेली व्यक्ती म्हणजे स्त्री होय. अशी स्त्री आपल्या मतानुसार आपल्या उदरात माणसाशी मिळता जुळता असा त्याचा अंश घेते. म्हणजेच एक स्त्रीत्व निर्मिती करून दुस—या स्त्रीत्वाला किंवा पुरूषत्वाला जन्म देते. अशी जन्म देण्याची क्षमता असलेली व्यक्ती म्हणजे स्त्री होय.

**स्त्रीपणा संकल्पना :**

स्त्रीपणा म्हणजे काय याचा शोध घेता ब—याचवेळा असे दिसते की, स्त्री पुरूषासारखी आणि पुरूष स्त्रीसारखा वागतो. मग ती पूर्णपणे पुरूष आणि तो पूर्णपणे स्त्री होऊ शकतो का? याचे उत्तर विज्ञान आपल्याला नाही असेच देते. पण त्यांचे असे जे परस्पर विरूध्द वर्तन असते त्याचे रूपांतर मात्र स्त्री असल्यास स्त्रीतच आणि पुरूष असल्यास पुरूषातच होऊ शकते. याला 'लिंगांतर्गत बदल' असे म्हणता येईल.[८] त्यांच्यात असे वैगुण्य निर्माण होण्याचे कारण असे सांगितले जाते की, पुरूषाचे वीर्यपिंड आणि स्त्रीचे रज:पिंड यांच्या वाढीतील दोष होय. ही वाढ तशी निर्दोष होणे हे रंगसूत्रांच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असते. असे वैगुण्य निर्माण झाले तर त्याला 'गोनडल लिंगदोष' असे म्हणतात. हे निर्माण होण्याचे कारणही ख्यातनाम सी. जे. ज्युअर्ट.[९] असे सांगतात की, 'स्त्री काय अगर पुरूष काय तसा हमखास स्त्री अगर पुरूष नव्हेच. प्रत्येकाच्या शरीरात पुरूष व स्त्रैण असे दोन्हीही अंत:स्त्राव असतात. याशिवाय काही मर्यादेपर्यंत स्त्रीत्व आणि काही मर्यादेपर्यंत पुरूषत्व असते. शंभर टक्के स्त्री आणि शंभर टक्के पुरूष ही 'सज्जन राजकारणा' इतकी दुर्लभ असतात. अशा दोन्हीही स्त्रावांमुळे परस्परांमध्ये स्त्रीपणा आणि पुरूषीपणा असतो. स्त्रीने पुरूषासारखे वागणे म्हणजे पुरूषीपणा आणि पुरूषाने स्त्रीसारखे वागणे म्हणजे स्त्रीपणा किंवा बायकीपणा असे म्हटले जाते.

यावरूनच स्त्रीपणा म्हणजे काय हे स्पष्ट होते. स्त्री असणे वेगळे आणि स्त्रीसारखे दिसणे किंवा स्त्रीरूप धारण करणे वेगळे. ब—याचवेळा पुरूष नारीरूप धारण करतात.याचे स्पष्टीकरण डॉ.म.सु.पाटील आपल्या आदिबंधात्मक संकल्पना स्पष्टीकरणात स्पष्ट करतात.[१०] पुरूष हा स्त्रीपणा काल्पनिक पातळीवर अनुभवू शकतो. काही कलावंत स्वत:ला स्त्री समजून स्त्रीसुलभ भावनांचा, अनुभवांचा आविष्कार आपल्या कलेतून करतात. उदाहरणच घ्यावयाचे झाले तर कवी भा.रा.तांबे ही 'रतले मी पर पुरूषाशी' असे म्हणतात. रामकृष्ण परमहंस हे राधेचा वेश परिधान करीत असत. झाशीची राणी लक्ष्मीबाई हीचे पती गंगाधरपंत हे

देखील स्त्रीवेशात वावरत असत. बालगंधर्व हे तर साक्षात स्त्रीपणाच म्हणावा लागेल. कवी पु. शि. रेगे, कवी अनिल, कवी बोरकर, कवी कुसमाग्रज, व इतरही काही कवींनी काल्पनिक पातळीवर आपला भावाविष्कार केलेला आहे. संतकवींनी तर आपल्या विराण्या आणि गवळणींमधून स्त्री भावनेचा तसेंच शाहिरांनी लावण्यांमधून स्त्रीपणाच व्यक्त केलेला आहे. तेव्हा 'स्त्रीपणा' म्हणजे स्त्रीत्वाचे सर्व गुण काल्पनिक पातळीवर लेवून स्त्री अनुभव व्यक्त करणे असे म्हणावेसे वाटते. स्त्रीची रती व जन्म देणे ही प्रमुख कर्तव्येसुध्दा काल्पनिक पातळीवर अनुभवणे यालाही स्त्रीपणा असे म्हणता येईल.

**स्त्रीत्व संकल्पना :**

'स्त्रीत्व' म्हणजे काय याचा विचार करीत असतांना 'स्त्रीत्व' हे लिंग वैशिष्टयांबरोबरच येते व स्त्रीत्व हा जैविक घटक आहे असे दिसते. स्त्रीत्व इतके गूढ अंतर्मनातून जन्माला आलेले आणि जीवनाच्या मूळ स्त्रोताशी संबंधित आहे व ते स्त्रीचे खास असे वैशिष्टय आहे. या स्त्रीत्वाला कमी लेखून त्याचे स्पष्टीकरण अनेकांनी आपापल्या परीने केले आहे. 'स्त्रीत्वाचे गुण असलेल्या सौंदर्यवती म्हणजे बायका' असे डेव्हिड हयुमही म्हणतो.[११] सहानुभूतीसारख्या सद्गुणांचा पुरस्कार करणारा आणि दुस—याच्या दुःखाबद्दल अनुकंपा ठेवणारा हा डेव्हिड हयुम स्त्रियांबद्दल मात्र पुरातन विचारांनाच महत्व देतो. त्याच्यादृष्टीने पुरूष हा घरातला कर्ता आहे. पुरूषा—पुरूषांमध्ये प्रस्थापित होणा—या नैतिक संबंधांमध्ये स्त्री ही सहभागी होऊ शकत नाही. डेव्हिड हयुम प्रमाणेच ॲरिस्टॉटलही.[१२] असेच म्हणतो की, 'स्त्रियांचे गुणधर्म वेगळे असतात. विनम्रता, योनीशुचिता ही स्त्रियांसाठी नैतिक मूल्ये आहेत, ती पुरूषांसाठी नाहीत'. म्हणज दोघेही तिच्या स्त्रीत्वालाच महत्व देतात.

लोकशाहीचा पुरस्कर्ता रूसो हा सुध्दा 'स्त्रीत्वाला' पुरूषांपेक्षा कमी दर्जाचे मानतो..[१३] त्याच्या मते तर स्त्रिया हया जन्मतःच पुरूषांपेक्षा कमजोर असतात. निर्मितीसाठी स्त्रियांचे शरीर योग्य आहे, सामाजिक जीवनासाठी नाही. स्त्रीत्वाला त्याने असे जखडून ठेवले आहे आणि या स्त्रीत्वाचा विकास पुरूषाच्या रस्त्यावरून जाऊ दिलेला नाही. तो म्हणतो की, विकारांवर आळा घालून पितृत्व सिध्द करण्यासाठी, एका पुरूषाशीच एकनिष्ठ राहणे हे स्त्रीचे कर्तव्य आहे. हे स्त्रीत्वाला घातलेले आळे आहे. तसेंच रूसा म्हणतो की, 'स्त्रीत्वाचे वेगळे वैशिष्टय हे आहे की कामपिपासू वृत्तीला आळा घालून पुरूषाला चाळवून खूष ठेवणे, नम्रपणे वागणे, अन्याय सहन करणे, पोकळपणा दर्शविणे, थोडेफार कला—कौशल्य दाखविणे ही स्त्रीत्वाची लक्षणे आहेत. म्हणजे रूसोच्या सामाजिक करारात स्त्रीला तसेंच स्त्रीत्वाला कुठेही स्थान दिसत नाही.

ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-II, Issue-III October 2013

स्त्रीच्या स्त्रीत्वाबद्दल, त्याच्या विकासाबद्दल, लक्षणांबद्दल अनेकांनी आपापली मते व्यक्त केली आहेत आणि त्या सर्वांवरून असे जाणवते की या व्यक्त करण्याने नेमके स्त्रीत्व म्हणजे काय हे समजण्यापेक्षा स्त्रीभोवती एक अनाकलनीय असे गूढच कसे निर्माण होत गेले आहे हेच सांगितले आहे. फ्राईड सारखा मानसशास्त्रज्ञ सुध्दा याची कबुली देतो. तो म्हणतो की, ''स्त्री ही इतकी गूढ व प्रश्नार्थक वाटते की तिला काय हवे आहे याचे संशोधनानंतरही उत्तर मला देता आलेले नाही.[१४]

'स्त्रीत्व' हे लिंग वैशिष्टयांबरोबरच येत असते. किंबहुना स्त्रीत्व म्हणजे निसर्गदृष्टया तिच्या शरीराची असलेली ठेवण किंवा जन्मत:च तिच्या वाटयाला आलेले 'स्त्री लिंग' होय असेही म्हणता येईल. या लिंगाचे परिवर्तन मात्र शक्य नसते. स्त्रीत्व हे लादलेले नसते किंवा लादता येणारेही नसते तर ते जन्मजात असते. परंतु स्त्रीच्या जन्मजात नसलेले गुण मात्र नंतर याच स्त्रीत्वाच्या आधारे तिच्यावर लादले जातात हे ही दिसते. निसर्गत: वाटयाला आलेले स्त्रीत्व हे तिला स्वीकारावेच लागते आणि मग हे हेच स्त्रीत्व पुन्हा विकसित झाल्यावर ती एका नव्या स्त्रीत्वालाही जन्माला घालीत असते. असे स्त्रीत्व हे संभोगातून एका पिढीकडून दुस—या पिढीकडे संक्रमित होत असते. प्रत्येक पिढीचा या स्त्रीत्वाकडे पाहण्याचा दृष्टिकोनही हळूहळू बदलत असतो. काही वेळा तर पूर्वीचा पारंपरिक अर्थही गडद होत गेलेला दिसतो. तर काही वेळा स्त्रीत्वाकडे उदार दृष्टिकोणातून पाहिले जाते. विसाव्या शतकाचा उत्तरार्ध तर या स्त्रीत्वाचा विकास करण्यासाठीच अधिक कार्यरत आहे असे म्हणणे अतिशयोक्तिचे ठरणार नाही.

या 'स्त्रीत्वा' ला सार्थकता प्राप्त होते ती स्त्रीला मातृत्व जेव्हा प्राप्त होते तेव्हा. स्त्रीत्वाचे एकंदर दोन मूलस्त्रोत आहेत, एक म्हणजे सृजनता आणि दुसरे म्हणजे मातृत्व. पण ही स्त्रीत्वाची लक्षणे, हे मूलस्त्रोत पुरूषाच्या संबंधांशिवाय प्रत्यक्षात दिसत नाहीत आणि ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. स्त्री ही निर्मितीक्षम आहे हे मान्य केले पाहिजे आणि यातच तिच्या जन्माचे सार्थक आपण पहात आलो आहे. स्त्री ही पुरूषाला नेहमी ऐंद्रिय आव्हान करते आणि यातूनच हे स्त्रीत्वाचे दोन मूलस्त्रोत बाहेर पडतात. स्त्रीची भावना आणि वासना हे तिचे सामर्थ्य असते. त्या भावना आणि वासना फुलविणारे स्त्रीशरीर म्हणजेच स्त्रीत्व हे त्या सामर्थ्याचे स्थान असते असेही म्हणता येईल.

स्त्रीला स्त्रीत्व, शरीररचना, वर्तन, कार्य आणि घटना यांवरून पडलेली नावे : किशोरी — कृशोदरी, कृष उदर असलेली, लहान सुंदर मुलगी (कृश— अशक्त, कृष—निर्मिती करणारे). नार—गाभा असलेली (गर्भाशय असलेली).माहेवणी—माई (मातृव्या) . वणी (वनिता),गरोदर स्त्री किंवा रजस्वला स्त्री, दुहिता — दुध काढणारी स्त्री. स्वसृ : आपल्याच लोकात राहून आपल्याच बंधूशी विवाह करणारी.

पत्नी—पत्यु—पती—पतीचे घर सांभाळणारी, भार्या — पळवून आणलेली. मातृ—मा—मोजणे, अन्न मोजून देणारी. (पा — पालन करणे, पितृ — पालन कर्ता, रक्षणकर्ता). जनि—जन्म देणारी, पोरे विणारी, जनांना जन्म देणारी. देवृ—सवतीबद्दल दया आणि सहानुभूती दाखविणारी.नणंदृ—एका टोळीतन दुस—या टोळीत बळजबरीने पळवून नेलेल्या मुलीबद्दल सहानुभूती बाळगणारी. दीक्षिणी—पतिव्रता स्त्री. दीक्षित म्हणजे याज्ञिक, याज्ञिकाची पत्नी.(वरील नावे भारतीय विवाह संस्थेचा इतिहास—वि. का. राजवाडे आणि मराठी व्युत्पत्तीकोश — कृ. पां. कुलकर्णी या पुस्तिकांमधून घेतलेली आहेत). याच सर्व नावांवरून स्त्रीचे नातेसंबंध, भूमिका आणि कार्य स्पष्ट होत जाते.

याचबरोबर स्त्रीच्या अंगी असलेल्या गुणांवरून आणि तिच्या शरीर सौंदर्यावरून तिला काही नावे पडलेली दिसतात.जसे, स्त्रीच्या अंगी असलेल्या शालीनता या गुणावरून तिला 'शालीनी' असेही म्हटले जाते. तसेंच तिच्या शरीर सौंदर्यावरून म्हणजेच 'मृगाक्षी', 'मृगनयना', 'सुनयना', 'सुनेत्रा', 'मिनाक्षी', 'सुदर्शना', 'अंगना', 'शुभांगी', 'सुवासिनी', अशी कितीतरी नावे तिला ठेवलेली दिसतात.

निसर्ग विकासाच्या जशा काही अवस्थ आहेत तशाच स्त्री विकासाच्या देखील काही अवस्था आहेत. बालिका—किशोरी—कुमारिका—यौवनी—तरूणी—प्रौढा—वृध्दा या टप्प्यांनी स्त्री विकसित होते आणि अशी विकसीत होत असतांना तिला तिच्या जीवनात अनेक भूमिकाही बजवाव्या लागतात व त्या बजावित असतांना त्या प्रत्येक अवस्थेतील तिची मानसिक स्थितीही बदलत असते. हे मानसिक परिवर्तनसुध्दा तिच्या शारीरिक परिवर्तनाशीच संबंधित असते. त्याचप्रमाणे परिस्थितीसापेक्षही तिची मानसिक स्थिती बदलत असते आणि या बदलत्या मानसिक स्थितीचे आविष्कार तिच्या वर्तनातून जाणवत असतात.

**स्त्रीची शारीरिक लक्षणे, पुरूषांपेक्षा वेगळेपण आणि साहित्याचे आकर्षण :**

स्त्रीची शारीरिक लक्षणे, पुरूषांपेक्षा वेगळेपण आणि साहित्याचे आकर्षण, स्त्री देहाचे सर्वात महत्वाचे लक्षण म्हणजे तिचें लैंगिक अवयव होत. गर्भाशय, योनी ही तर तिची व्यवच्छेदक लक्षणे आहेत. तिला येणारी मासिक पाळी ही लैंगिक सामुग्री तिच्या देहांतर्गतच असते. लैंगिक वासना ही नैसर्गिक बाब आहे, पण या भावनेलाही नैसर्गिक बाबींबरोबरच नीतीमत्तेचे वलय येते. या समाजमान्य नीतीचे उल्लंघन स्वत:हून करतांना ती दिसत नाही. वासनेच्या आहारी जाणे हे तिच्या स्वभावात नसते असे म्हटले जाते, पण वासनेला मात्र तिला बळी पडावे लागते हे ही दिसते. तिचे शरीर, मन आणि भावना हया पुरूषांपेक्षा भिन्नच असतात आणि ती पुरूषांपेक्ष कशी वेगळी आहे हे सांगावयाचे झाल्यास स्त्रीची शारीरिक वैशिष्टये व तिची मानसिकता लक्षात घ्यावी लागते. पुरूष हे पुरूषी कार्य करतात तर स्त्रिया हया स्त्रैण कार्य

करतात. 'स्त्रैण' याचा अर्थ संस्कृतीने नेमून दिलेली स्त्रियांनी करावयाची कार्ये. पुरूष आक्रमक व शारीरिक धडपडीची कार्ये करतात. यांत्रिक कार्ये करतात. व्यापार, राजकारण, धंदा, युध्द यांचे त्यांना आकर्षण वाटते. पण स्त्रिला मात्र मातृसुलभ सेवा, प्रेम गोष्टी करण्यातच गोडी वाटते. तिला असे वाटणे यासाठीही तिच्या शारीरिक लक्षणांवरून आणि मानसिकतेवरून तिचे वेगळेपण वारंवार स्पष्ट केले जाते. याबद्दल शास्त्रज्ञ आपले मत व्यक्त करतांना दिसतात. उत्क्रांतीकार डार्विनही असे म्हणतो की, 'उत्क्रांती फे—यात स्त्री पुरूषाच्या खूपच पाठीमागे आहे. तिच्या कवटीचा आकार छोटा आहे. त्यात असणारा मेंदूही पुरूषांपेक्षा छोटा आहे. स्त्रिच्या कवटीच्या विशिष्ट रचनेमुळेच तिच्या चेह—याची ठेवणही वेगळी असते. तिचा चेहरा लहान व गोलसर असतो. त्वचेची नरमाई व मांसल ठेवण यामुळे तो खरोखरीच स्त्रीचा वाटतो.'[१५] पुरूषांच्या मानाने लहानखुरा बांधा, ठेंगणी, ठुसकी असा आपल्याकडचा शब्द, पुढे झुकणारा जबडा, चेह—यावरील लघुकोन, केश सांभार, छोटे पाय, हाताची नाजूक व निमुळती बोटे, स्त्रीच्या हाताचा अंगठा व तिची टाच हे देखील पुरूषांपेक्षा वेगळे असतात. हे अवयव वेगळे असण्याचे कारण हॅवेलॉक एलीस देखील म्हणतो की,'कदाचित आई, गृहिणी म्हणून नाजुक कामे करतांना तिला पुरूषांसारख्या अवयवांची आवश्यकता किंवा गरज नसावी'.[१६] म्हणून तोच पुन्हा स्त्रीबद्दल म्हणतो की, 'स्त्री ही स्त्रीच, अगदी छोटयाशा टाचेपर्यंत.'[१७] स्त्रीची हालचालही पुरूषापेक्षा वेगळी असते. 'सहज तुझी हालचाल, मंत्रे जणू मोहविते' असे कवी भा. रा. तांबे म्हणतातच ना! किंवा 'लट पट लट पटं तुझं चालणं मोठया नख—याचं' असेही होनाजी बाळाने म्हटले आहे. तिच्या चालीने, 'हिची चाल तुरूतुरू' अशा चालीने घायाळ करणारी आणि चालतांना जेव्हा वळून पहाते तेव्हा कवी रेगे म्हणतातच की,

'मागे वळूनी पहाशी, उभा गांव चालविशी
मागे वळूनी पहाशी, उभा गांव चाळविशी.'

स्त्रीचे लाडात येउन बोलणे, हातावर टाळी वाजविणे ही लकब खास स्त्रीचीच असते. पुरूषांपेक्षा वेगळेपण दर्शविणारे तिचे व्यवच्छेदक लक्षण म्हणजे तिचे वक्षस्थळ होय. हे तिच्या सौंदर्याचे प्रतीकही आहे. पुढच्या येणा—या भावी पिढीच्या अन्नाची सोयही आहे.

तसेंच कवी पु. शि. रेगे यांची बदामी वैशाख ही कविता स्त्रीच्या स्तनांचे वर्णन करणारी कविता आहे. स्त्रीची त्वचा पुरूषी त्वचेपेक्षा मुलायम असते. तिच्या गालाचा रंग गुलाबी असतो. तिच्या या गालांच्या सौंदर्याबरोबरच तिच्या नाजुक त्वचेतून होणारे लाल रक्ताचे प्रदर्शनी मोहविणारे असते. मस्तानीचे उदाहरण आपल्याला येथे आठवावे किंवा कवी रेगे यांची 'साठेबाज' कविताही आठवते.

'लाल तुझा अंगवठा, लाल तुझ्या अंगी ताठा

लाल रक्ताच्या पेशींचा, किती केलास ग् साठा.' – दोला (सुहृदगाथा)

तिच्या रंगाबद्दल रेगे तिला चाफेगोर असेही म्हणतांना दिसतात. स्त्रीची त्वचा ही नुसतीच नाजुक, मुलायम किंवा गौर नसते तर ती अतिशय संवेदनशीलही असते. तिच्या हव्याहव्याशा वाटणा–या लाजेचा उगमही याच संवेदनशीलतेत असावा. तिचे लाजणे देखील किती जीवघेणे असते आणि या लाजेमुळे निर्माण होणा–या तिच्या हज्जार हरकती, हिकमती, हुकूमती किती जीवघेण्या असतात हे सांगतांना कवी आरती प्रभू लिहितात,

'तुझ लाजणं, मग वा–यावर केस सोडणं

हज्जार हरकती, हिकमती, हुकूमती

हे हे सगळंच जीव घेणं.' –– सर्व ठिकाणी (नक्षत्रांचे देणे).

तिचा आवाजही नाजूक व मृदू असतो. ''बोलणं ग् मंजुळ मैनेचं', तिच्या ओठांवरचं हसूसुध्दा 'कातिल' असते. एकंदर तिच्या शरीर सौंदर्याबद्दल व लक्षणांबद्दल कवी रेगे लिहितात,

'सतेज तुझे बोलणे–चालणे, सुकुमार खेळे अंगी नव्हाळी

क्षणभर वाटे, अपूर्व जणु हिमसेक हा, स्वच्छ निरागस तेजाळ विश्रब्ध.' – हिमसेक (गंधरेखा)

या शारीरिक लक्षणांबरोबरच मानसिक लक्षणांमध्येही स्त्रियांबद्दल काही मते व्यक्त केली जातात. सुप्रसिध्द सामाजिक शास्त्रज्ञ हॅवेलॉक एलीसन स्त्रीच्या बाबतीत तीन गोष्टींचा प्रामुख्याने उल्लेख केला आहे.[१८]

१. अधिक हळूवारपणा, ग्रेटर ॲफेक्टॅबिलिटी म्हणजे अधिक भावनाशील, अधिक रागावणे, रूसणे, रडणे या गोष्टी स्त्रियांच्या बाबतीत अधिक प्रमाणात संभवतत.या धुसफुसण्याची भरपाई स्त्रीने अधिक सहनशक्ती दाखवून केली आहे. स्त्रिया 'थंड' डोक्याने बरेच निर्णय घेऊ शकतात. मॅकबेथ 'चळला' पणं लेडी मॅकबेथ 'थंड' राहिली!

२. अत्यंत प्रतिभाशाली प्रज्ञेचे किंवा अत्यंत नीच कोटीचे कार्य करण्याची क्षमता स्त्रीमध्ये नसते. शेक्सपियर, आईनस्टाईन, ज्ञानेश्वर, हिटलर, चेंगीजखान यांच्या पंक्तीला बसवायला स्त्रिया सापडणार नाहीत.

३. बॉयोलॉजिकल कन्झर्वेशन आणि इनटॅन्टीलिटी इनव्हॉल्वींग लीडरशीप. पुरूषांपेक्षा स्त्रीने आपले परंपरागत स्वरूप टिकवून ठेवले आहे. कुठलीही सुष्ट किंवा दुष्ट गोष्ट पुरूषाला स्त्रीच्या मदतीशिवाय, सहचर्याशिवाय पार पाडता येणे कठीण दिसते.

या हॅवेलॉक एलीसच्या मतावरून स्त्रियांमधील सद्‌गुणच स्पष्ट होतात. स्त्रियांबद्‌दल आणखीही काही मते आपल्याला ऐकायला मिळतात की स्त्रियांना पुरूषांपेक्षा सहानुभूतीची अधिक गरज भासते. स्त्रियांना बौध्दिक चिकित्सेचे वावडे असते किंवा त्यांची बुध्दीमत्ता हीन दर्जाची असते, पण हे सर्वच खरे दिसत नाही. श्रेष्ठ बुध्दिमत्तेच्या स्त्रिया आजही आहेत आणि पूर्वीही होत्या. स्त्रिया अधिक हळव्या व भावनाशील असतात. त्यांच्या मनातील भाव–भावनांचे प्रतिबिंब तात्काळ त्यांच्या चेह–यावर दिसते. त्यांचे वर्तनही त्यांच्या अंत:प्रेरणेनुसार ठरते. अशी ही स्त्रियांची मानसिक वैशिष्टये पुरूषांपेक्षा वेगळी आहेत. त्यांच्या हया सर्व वैशिष्टयांमुळेच स्त्री ही अधिकाधिक गूढ होत गेलेली दिसते. स्त्रीचे खास असे वेगळेपण तिच्या शारीरिक वैशिष्टयांवरून आणि वर्तनावरून जाणवतेच. तिचे शारीरिक खास असे वेगळेपण म्हणजे ‘स्त्रीत्व’ आणि तिचे तसे वर्तन म्हणजे ‘स्त्रीपणा’.

## संदर्भ :

१. कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी : मराठी व्युत्पत्तीकोश, श्री लेखन वाचन भांडार, द्वितीय आवृत्ती, १९६४, पृ. क्र.८०४.

२. तत्रैव, पृ. क्र.८०४

३. कित्ता, पृ. क्र.८०६

४. तत्रैव, पृ. क्र.८०६

५. नारायण परशुराम थत्ते : डॉ. सौ. मनोरमा थत्ते, आदर्श स्त्री जीवन, राष्ट्र वैभव प्रेस, मुंबई, पृ. क्र. ३०.

६. द. न्यू लेक्सीकॉन वेबस्टर्स डिक्शनरी ऑफ द इंग्लिश लॅग्वेज डिलक्स इनसायक्लोपिडिया एडिशन रिवाईजड १९८७ पेज नं. ११३०

७. कित्ता, पृ. क्र. ३४५.

८. आश्विनी धोंगडे : स्त्रीवादी समीक्षा, स्वरूप आणि उपयोजन, दिलीपराज प्रकाशन. पुणे प्र. आ. १९९३, पृ. २५.

९. तत्रैव, पृ. क्र. २५

१०. तत्रैव, पृ. क्र. २५

११. कित्ता, पृ. क्र. ३८.

१२. र. गं. विद्वांस : स्त्री आणि पुरूष, श्रीगजानन बुक डेपो, प्रकाशन पुणे प्र. आ. १९८०, पृ. क्र. २३

१३. तत्रैव, पृ. क्र. ३१

१४. तत्रैव, पृ. क्र. ३१

१५. गोपाल दत्त कुलकर्णी : स्त्री शारदा प्रकाशन, वजिराबाद, नांदेड, प्र. आ. १९७८, पृ. क्र. ७

१६. र. गं. विद्वांस : स्त्री आणि पुरूष, श्रीगजानन बुक डेपो, प्रकाशन पुणे प्र. आ. १९८०, पृ. क्र. २३

१७. तत्रैव, पृ. क्र. २३

१८. डॉ. म. सु. पाटील : पु. शि. रेग्यांचे कादंबरी विश्व, अनुष्टुभ, जुलै–ऑगस्ट १९७८, पृ. क्र. ९०.